# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 15 October 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ दुपारी १.०० वा.**

****

गडचिरोलीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज ६१ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. यामध्ये सीपीआय माओवादी पोलिट ब्युरो सदस्य मल्लौजुला वेणुगोपाल राव उर्फ सोनू उर्फ भूपती याचा समावेश आहे. राज्य सरकारने या नक्षलवाद्यांवर पाच कोटी २४ लाख रुपयांचं बक्षीस ठेवलं होतं. आत्मसमर्पण केलेल्या सर्व नक्षलवाद्यांना संविधानाची प्रत, तसंच नक्षलपिडीत कुटुंबांना धनादेशा वितरणही करण्यात आलं. सप्टेंबरमध्ये भूपतीनं शस्त्र सोडण्याचे संकेत देणारं पत्रक जारी केलं होतं, ज्याला छत्तीसगड आणि देशातल्या इतर नक्षलवाद्यांनी पाठिंबा दिला होता. केंद्र आणि राज्य सरकारांच्या सातत्यपूर्ण कारवाईमुळे नक्षलवादी चळवळ आता शेवटच्या टप्प्यात आहे. मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद पूर्णपणे नष्ट करण्याचं उद्दीष्ट महाराष्ट्राने आधीच पूर्ण केल्याचं मुख्यमंत्री म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

मुख्यमंत्री फडणवीस आज मुंबईतून विमानाने सोलापूरमध्ये स्वतः प्रवास करून या विमानसेवेचा प्रारंभ करणार आहेत. आजपासून सोलापूर ते मुंबई आणि सोलापूर ते गोवा ही विमानसेवा आता सातत्याने सुरु राहणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत १६ व्या आंतरराष्ट्रीय रेल्वे उपकरण प्रदर्शन–२०२५ चं उद्घाटन केलं. आशियातल्या सर्वात मोठ्या आणि जगातल्या दुसऱ्या क्रमांकाच्या या रेल्वे प्रदर्शनात १५ हून अधिक देशांमधले ४५० हून अधिक उत्पादक सहभागी झाले आहेत. अत्याधुनिक रेल्वे आणि मेट्रो उत्पादने या प्रदर्शनात ठेवण्यात आली आहेत. देशातल्या रेल्वेचं जलद गतीनं आधुनिकीकरण

करण्यासाठी दरवर्षी दोन लाख ५६ हजार कोटी रूपयांची गंतवणूक होत असल्याचं वैष्णव यांनी यावेळी नमूद केलं.

****

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय करिअर सेवा – एनसीएस मंचाद्वारे लवचिक आणि तंत्रज्ञान–सक्षम उपजीविकेच्या संधी वाढवण्यासाठी झोमॅटो सोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. यामुळे दरवर्षी सुमारे अडीच लाख रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात, अशी माहिती केंद्रीय कामगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी दिली. एनसीएस पोर्टल राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नोकरी शोधणाऱ्यांसाठी महत्त्वाचं व्यासपीठ आहे. लाखो व्यक्तींना रोजगार आणि उपजीविकेच्या संधींशी जोडण्याचा हा उपक्रम असून, यामुळे गिग अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, तसंच ऑनलाइन अन्न वितरण क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी नवीन संधी निर्माण होतील, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

भारताचे माजी राष्ट्रपती आणि 'मिसाईल मॅन' म्हणून ओळखले जाणारे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती आज वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी होत आहे. विज्ञान, शिक्षण आणि राष्ट्रसेवेसाठी कलाम यांची निःस्वार्थ निष्ठा आजही अनेक पिढ्यांना प्रेरणा देते. कलाम यांनी भारताच्या अंतराळ आणि क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमात मोलाची कामगिरी बजावली, तसंच १९९८ मधल्या पोखरण–२ अणू चाचणीमध्येही त्यांचा महत्वपूर्ण सहभाग होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दृश्यफितीद्वारे कलाम यांना आदरांजली वाहिली, तर केंद्रीय मंत्री अमित शाह यांनीही त्यांच्या राष्ट्रनिष्ठा आणि विज्ञान, तंत्रज्ञान, संरक्षणातील योगदानाबद्दल गौरव व्यक्त केला.

****

परभणी जिल्ह्यात पूर्णा तालुक्यातल्या कातनेश्वर इथल्या जिल्हा परिषद शाळेत वाचन प्रेरणा दिनानिमित्त वाचन स्पर्धा घेण्यात आली. प्रथम सत्रात जास्त पुस्तकं वाचन केलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन गौरवण्यात आलं.

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर नगरपरिषद प्राथमिक शाळेत डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचं पूजन करून त्यांच्या कार्याविषयी तसंच वाचन दिनाविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

वाचन प्रेरणा दिनानिमित्त आज छत्रपती संभाजीनगर इथं मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीनं कविसंमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. परिषदेच्या ना गो नांदापुरकर सभागृहात संध्याकाळी साडे पाच वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाच्या विविध उपक्रमांचा आणि योजनांचा लाभ देण्यात येत असून, सामाजिक दायित्वाचा एक भाग म्हणून जिल्हा प्रशासनानं ‘एक हात मदतीचा’, हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. यामध्ये उद्या आणि परवा म्हणजे १६ आणि १७ तारखांना, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत म्हणून जीवनावश्यक वस्तूंचं किट देण्यात येणार आहे.

****